स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
मुख्य कार्यालय, विरार
विरार (पूर्व),
ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०५.

वसई-विरार शहर महानगरपालिका
स्थापना : ३ जुलै २००९

दूरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म.५५-मा ५१५/८/२०२२
दिनांक : ११/११/२०२२

## पाणीपुरवठा विभाग, मुख्यालय
## जाहिर सुचना

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, महानगरपालिका क्षेत्रात ज्या नागरीकांना नविन नळजोडणी आवश्यक आहे अशा नागरीकांनी अर्जासोबत अथवा यापुर्वी सादर केलेल्या अर्जासोबत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचा चालु व थकीत मालमत्ता कराचा १००% भरणा महापालिकेकडे करून त्याच्या पावतीची छायांकीत प्रत सादर करावी. तसेच ज्या नागरीकांकडे यापुर्वी नळजोडणी आहे व अतिरिक्त नळजोडणी मंजूरी करीता अर्ज सादर केला आहे अशा नागरीकांनी देखील सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचा चालु व थकीत मालमत्ता व पाणीपट्टी कराचा १००% भरणा महापालिकेकडे करून पावतीची छायांकीत प्रत संबंधीत पाणीपुरवठा कार्यालयाकडे सादर करावी.

वरील प्रमाणे मालमत्ता व पाणीपट्टी कर थकीत रकमेसह १००% भरणा करण्यासह अन्य आवश्यक कागदपत्रांची पुर्तता झाल्यानंतर प्रभाग निहाय तसेच रक्कम भरलेचे दिनांक निहाय प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल. दरम्यानच्या कालावधीत महापालिकेस मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सुर्या टप्पा (३) मधून ४०३ द.ल.ली. पाणी पुरवठा योजनेतून १८५ द.ल.ली. पाणी उपलब्ध होणार आहे. सदर योजना कार्यान्वित झाल्यानंतर प्रतिक्षा यादीनुसार नविन नळजोडण्या मंजूरीस व प्रत्यक्ष जोडणीस प्राधान्य देण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. सदरची योजना १५ मार्च, २०२३ पावेतो कार्यान्वित राहील.

०३/११

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

Scanned by CamScanner